# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 12/06/2023 (सोमवार) सायंकाळ

---

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. भिवापूर :– अंतर्गत मौजा चिचाळा शिवार ता. भिवापुर येथे दिनांक ११/०६/२०२३ चे ०८.४५ वा. ते ०९.०० वा. सुमारास यातील मोटारसायकल हिरो होन्डा स्पलेंडर क्र. एम. एच.– ३१ डी.जी– ४५८५ चालक जखमी नामे सत्यवान रामचंद्र मुनघाटे रा. कन्हाळगाव हयाचे सोबत मृतक नामे– आकाश नरेश वाघमारे, रा. कन्हाळगाव हे दोन्ही मोटरसायकलवर बसुन उमरेड वरून चिचाळा करीता निघाले असता रस्त्यात चिचाळा शिवारात मागुन येणारी बस क्र. एम. एच.– ४० सी.एम.– ४१९१ चा चालक आरोपी नामे –जगदिश विकास लेंडे, वय ३२ वर्ष, रा. चिमुर यांनी आपले बस हे भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन ओव्हरटेक करीत असतांना मोटर सायकलला मागुन धडक दिल्याने मोटरसायकल चालक जखमी झाले व मागे बसलेला आकाश वाघमारे याचे मरणास आरोपी बस चालक हा कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– पोलीस उपनिरीक्षक संदीप सडमेक, पोस्टे भिवापुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापूर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३०४ अ भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक चंगोले मो. क्र. ७९७२४४१८४६ हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत मौजा सावरगाव वार्ड क्र. ०५ ता. नरखेड येथे दिनांक १०/०६/२०२३ चे २०.०० वा. दरम्यान यातील **मृतक नामे– दौलतराव राजाराम गायधने, वय ६० वर्ष, रा. वार्ड क्र. ०५ सावरगाव** याने पायाचे त्रासाला कंटाळुन किरायाचे रूममध्ये मयालीला नायलॉन दोरीने गळफास घेवुन आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस नायक साबीर शेख पोस्टे नरखेड हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर